# स्वातंत्र्यवीर सावरकरांचे साहित्य ई-बुकवर मोफत

## मायविश्वच्या बुकगंगा डॉट कॉम या संकेतस्थळाचा उपक्रम

■ मेधा पालकर ■

पुणे, दि. ४ - गडया रे छंद नसे चांगला... ही शृंगारिक लावणी असो, जाज्वल्य देशप्रेम व्यक्त करणारे सागरा प्राण तळमळला हे काव्य असो...साक्षात सरस्वती ज्यांना प्रसन्न होती अशा स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या लेखणीतून साकारलेलं वैविध्यपूर्ण साहित्य आता वाचकांना बुकगंगा डॉट कॉम या संकेतस्थळावर ई बुकच्या माध्यमातून मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे.

माझी जन्मठेप, माझ्या आठवणी, १८५७ चे स्वातंत्र्य समर, हिंदू पदपादशाहीचे दोन खंड, हिंदूत्व, हिंदू राष्ट्रदर्शन, हिंदूत्वाचे पंचप्राण, तेजस्वी तारे, विज्ञाननिष्ठ निबंध भाग १, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कविता, रणशिंग, मराठी भाषेचे शुध्दीकरण, काळे पाणी, नेपाळी आंदोलनाचा उपक्रम याबरोबरच संगीत सन्यस्तखङग, संगीत उःश्याप, संगीत उत्तरक्रिया ही नाटकं, कथा, कादंबऱ्या, स्वातंत्र्यवीरांच्या कविता अशी मराठी आणि इंग्रजी भाषेतील ५८ पुस्तके मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहेत, अशी माहिती बुकगंगाचे मयुरेश जोगळेकर यांनी दैनिक सामना शी बोलताना दिली.




बुकगंगा डॉट कॉम या संकेतस्थळावर ईबुकच्या माध्यमातून वाचकांना ते वाचता यावे यासाठीचे खास सॉफ्टवेअर विकसीत करण्यात आले आहे. हे सॉफ्टवेअर डाऊनलोड केल्यानंतर ही सर्व पुस्तके वाचनासाठी मोफत संगणकावर खुली होतात. राष्ट्रीय स्मारक ट्रस्टने ही सर्व पुस्तके बुकगंगाला दिल्यामुळे वाचकांना ईबुकच्यामाध्यमातून ती उपलब्ध करून देता आली आहेत. संपूर्ण सावरकरांच्या साहित्याचे दर्शन आता घरबसल्या वाचकांना घेता येणार आहे.

पुर्व पिठीका अथांग, आत्महत्या आणि आत्मसमर्पण, आंदमानाच्या अंधेरीतून, अंधश्रध्दा निमुर्लन, १८५७ चे स्वातंत्र्य समर या पुस्तकाचे चारही खंड, आता मृत्यूचे स्वागत, ऐतिहासिक निवेदने या पुस्तकांना वाचकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. स्वातंत्र्यवीरांच्या साहित्याबरोबरच बुकगंगाने इतर साहित्यामध्येही १६० दिवाळी अंक, १ हजार १२२ कादंबऱ्या, कथासंग्रह, ७१६ बालसाहित्याची पुस्तके, ११६ एकांकिका, ६०४ नाटके असे साहित्य मोफत उपलब्ध करून दिले आहेत.